कायम विनाअनुदान तत्वावर/
~~विनाअनुदान तत्वावर~~

जाक्र.प्रा.प्राशि-३/खाप्राशा/मा./पुवि/२०
शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे-१, यांचे कार्यालय.
दिनांक : 26 MAR 2007

प्रति

१. ~~शिक्षणाधिकारी (प्राथमिक),~~
~~जिल्हा परिषद/~~

२. शिक्षण प्रमुख/प्रशासन अधिकारी
महानगरपालिका/~~नगरपालिका~~ शिक्षण मंडळ, पुणे-५.

**विषय** : सन २०० ४-२०० ५ या शैक्षणिक वर्षात नविन खाजगी प्राथमिक शाळेस परवानगी देणबाबत. (माध्यम मराठी)

**संदर्भ** : शालेय शिक्षण विभागाकडील पत्र क्रमांक व्हिएसएल/१००४ ( ५३२/ २००४)/प्राशि-३, दिनांक १२/०८/२००४

उपरोक्त विषयासंबंधीचे आपल्या कार्यालयास पृष्ठांकित केलेले शासनाकडील संदर्भाधिन पत्र कृपया अवलोकनी घ्यावे.

याबाबत कळविण्यात येते की, स्थानिक गरज लक्षात घेऊन खाली नमूद केलेल्या संस्थेला तिच्या नावासमोर दर्शविलेल्या ठिकाणी व माध्यमातून जून, २००४ पासून इ. १ ली च्या वर्गास ------ फक्त सन २००४-०५च्या शैक्षणिक वर्षात ~~प्रत्यक्ष सुरु असलेल्या वर्गास~~ शाळा सुरु करण्यास खाली नमूद केलेल्या अटींची पूर्तता करण्याच्या शर्तीवर ~~विनाअनुदान तत्वावर~~/कायम विनाअनुदान तत्वावर ~~परवानगी देण्यात येत आहे. ... खाजगी प्राथमिक शाळेस कायम विनाअनुदान तत्वावर~~ तसेच भविष्यात माध्यम बदलता येणार नाही या अटीवर परवानगी देण्यात येत आहे.

| अ.क्र. | संस्थेचे नांव | शाळेचे नांव व ठिकाण | इयत्ता | माध्यम |
|---|---|---|---|---|
| १ | २. | ३. | ४. | ५. |
| १] | स्वयंसिध्दा शैक्षणिक सामाजिक सांस्कृतिक मंडळ, सर्वे नं. १३६ वारजे माळवाडी, पुणे-५२. कायम विना अनुदान | वारजे माळवाडी पुणे-५२. | १ ली च्या वर्गास फक्त | मराठी |

**सदर परवानगी खालील शर्ती व अटींवर अवलंबून आहे. त्याचा भंग झाल्यास परवानगी रद्द होईल.**

3.१ सदर संस्था, नोंदणी अधिनियम १८६० व मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत किंवा केवळ मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत असली पाहिजे.

3.२ शाळेची इमारत व परिसर शिक्षणाकूल, स्वच्छ व सुरक्षित असला पाहिजे.

3.3 शाळेत शासनाने वेळोवेळी विहित केल्यानुसार शैक्षणिक व व्यावसायिक अर्हतेचा आवश्यक सक्षम कर्मचारीवृंद शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या वेतनश्रेण्या व सेवाशर्तींच्या अधिन राहून नेमला पाहिजे.

3.४ संस्थेची आर्थिक परिस्थिती, संस्थेकडील भौतिक सुविधा, व्यवस्थापनाविषयक सुविधा इत्यादी, शाळा व्यवस्थित चालण्यासाठी सुयोग्य असणे आवश्यक आहे.

3.५ संस्थेने या शाळेमध्ये शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या अभ्यासक्रमांची अंमलबजावणी केली पाहिजे. तसेच अभ्यासक्रम, पाठ्यपुस्तके, मुल्यमापन पध्दती, शालेय व सहशालेय कार्यक्रम आणि उपक्रम यांचे सुयोग्यतेने कार्यान्वित केले पाहिजे व त्यासाठी आवश्यक सर्व सुविधा

जा. क्र. शिउसं/प्राशि-३/७१/पुवि/०७
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग
पुणे-१ याचे कार्यालय
दिनांक:- 30 JUN 2007

प्रति,
सचिव,
स्वप्नसिद्धा शैक्षणिक सामाजिक सांस्कृतिक मंडळ
सर्वे नं. १३६, वारजेमाळवाडी,
पुणे-५२

विषय :- इ. ३ री ते ४ थीच्या वर्गास परवानगी देणेबाबत.

संदर्भ :- १] शासन पत्र क्र. नमाशा-१००४/[४०७/०४]/प्राशि-१
दि. २१/७/०४.
२] या कार्यालयाचे पत्र क्र. प्राशि-१/मा/पुवि/०७
दि. २६/३/०७ चे पत्र.

वरील संदर्भिय विषयान्वये कळविण्यात येते की, संदर्भ क्रमांक दोन अन्वये आपल्या संस्थेस वारजेमाळवाडी, पुणे-५२ येथील मराठी माध्यमाच्या खाजगी प्राथमिक शाळेस कायम विना अनुदान तत्वावर परवानगी देण्यात आलेली आहे. आपल्या विनंतीवरुन आपल्या शाळेस सन २००४-०५ पासून इ. ३ री ते ४ थीच्या पहिल्या तुकडीस परवानगी देण्यात येत आहे. इ. ५ वीचा वर्ग तात्काळ बंद करणेबाबतची कार्यवाही/ म. न. पा. शिक्षण मंडळ. पुणे याचे ना-हरकत प्रमाणपत्रासह ५ वीचा वर्ग सुरु करणेचा प्रस्ताव शिक्षण प्रमुख म. न. पा. शिक्षण मंडळ, पुणे यांना सादर करावा.

शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे-१.

स्थळप्रतीवर मा. शि. उ. स.
यांची सही असे.

प्रत माहितीसाठी-
शिक्षण प्रमुख,
महानगरपालिका शिक्षण मंडळ, पुणे-५.